भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ४४४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०६/२०१७

**१) शेतातील गवतावर चारण्यास गेलेल्या शेळीला जिवानिशी ठार करुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/०६/२०१७ चे १६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी प्रकाश बत्तुजी बोरकर वय ४७ वर्ष, रा. बेरोडी यांची शेळी आरोपीच्या शेतातील गवतावर चरण्यास गेली असतांना आरोपीने शेळीला जिवानिशी ठार मारुन ५,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४२९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलाला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १०/०६/२०१७ ते ११.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा वय १६ वर्ष, हयाला कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले असावे असे फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम ३६३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०६/०६/२०१७ ते १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलगी वय १७ वर्ष, ही घरी कोणालाही न सांगता निघुन गेली तिचा रिस्तेदारीत शोध घेवुन प्रत्यक्ष जावुन पाहनी केली असता मिळुन न आल्याने तिच्या वर्गात शिकणारा यातील आरोपी संशयीत मुलगा याने तिला पळवुन नेले असल्याचा संशय फिर्यादींने दर्शविल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली येथे कलम ३६३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) शेतात इसम मृत अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद :–**

दिनांक ११/०६/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील मृतक उत्तम गणपत तुमळे वय ३८ वर्ष, रा. आंबाडी हा नेहमी दारु पिण्याच्या सवईचा होता व तो मजुरी करीता बाहेरगावी गेला असता काम पुर्ण होईपर्यत घरी परत येत नव्हता दि. ०९/०६/२०१७ ला ब्रम्ही येथे मजुरीने तणसीचे कामावर गेला होता मृतक ब्रम्ही येथील रविन्द्र वैरागडे यांचे शेतात मृत अवस्थेत आहे असे फिर्यादीला माहीत झाले असतांना त्याने घटना स्थळी जावुन पाहीले असता मृतक हा मृत अवस्थेत आढळुन आला त्याचे मृत्यु बाबत फिर्यादीने कुठलीही शंका व्यक्त केली नाही व कुणावर संशय देखील घेतला नसल्याने फिर्यादी पद्माकर गणपत तुमळे वय ३० वर्ष रा. आंबाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

५) अवैध देशी/जुगार दारु अडयावर धाडी .  :—

दिनांक ११/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे मोहाडी, कारधा, तुमसर, साकोली, भंडारा, लाखांदुर, पवनी येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५६ लिटर हातभट्टी +११५ किलो सडवा मोहा पाल + साहित्य किंमती १३,२५०/—रु. ०५ लिटर १३० मिली लिटर देशी दारू किंमती १४२५/—रु. व जुगारातुन किंमती १,३२,५४५/—रु. असा एकुण किंमती १,४७,२२०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ११/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०६ तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ११० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

12.6.17

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.९९८७३८५४०५

PSI

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.